प्रकरण ६ वे

# निष्कर्ष

# प्रकरण ६ वे

## निष्कर्ष

'सारे प्रवासी घडीचे' व 'अशी मने असे नमुने' या दोन्ही साहित्यकृतींच्या अभ्यास करताना दोन्ही साहित्यातून जाणवणारा प्रदेश व त्यातील प्रादेशिकतेचा परिचय आणि दोन्ही साहित्यातील प्रादेशिकता याचा अभ्यास प्रस्तूतप्रबंधिकेत करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. तो अधिकाअधिक अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल हे सांगण्याचा प्रयत्न मी या प्रबंधिकंच्या प्रत्येक प्रकरणातून केला आहे.

मराठी वाङ्.मयातील विविध प्रकारांमध्ये ललित साहित्य निर्मिती होत असताना प्रामुख्याने प्रादेशिक साहिकृतीच्या निर्मितीला महात्मा गांधींच्या 'खेडयाकडे चला या घाषणेमुळे साहित्यातून घडवू लागला. या ठिकाणी 'प्रादेशिक संकल्पना स्पष्ट करताना ' प्रदेश' शब्दातून ' प्रादेशिक ठराविक असा भूखंड आहे तर तर प्रादेशिक या संज्ञेत त्या प्रदेशाची भौगोलिकता रचना संस्कृति , समाजव्यवस्था , लोकजीवन, प्रदेशातील लोकांची भाषा या सर्व गोष्टींचा अंतरर्भाव केला जातो. प्रादेशिकतेची संज्ञा स्पष्ट करताना त्यांचा पूर्वेतिहास तपासताना ग्रामीण – जानपद – स्थानिक रंगप्रवृत्ती– प्रादेशिक अशी साखळी स्पष्ट केली आहे. त्यामध्ये प्रा. आनंद यादव यांनी कोणतीही कादंबरी 'प्रदेशान्मुख' असते. या बाबत केलेले विवेचणा प्रादेशिक साहित्यकृतीचा आत्मा होय हे स्पष्ट केले आहे.

लेखकांच्या साहित्यकृतीमधून प्रादेशिकतेची कोणती ना कोणती तरी तत्वे आढळतात. व त्यांचा अभ्यास करणे हे महत्वाचे वाटते या करिता प्रादेशिक साहित्यकृतींचा अभ्यास करणे इष्ट ठरते. प्रादेशिक साहित्यामध्ये प्रामुख्याने देश व राज्य पातळीवर विभाग केले जातात. यामध्ये मराठी साहित्यकृतींमध्ये प्रामुख्याने ठळकपणे नजरेसमोर विदर्भ, देशावरची, व उत्तर कोकण, दक्षिण कोकण, नगर व मराठवाडा अशी विभागणी केली जाऊ शकते. याविषयी बा. भ. बोरकरांनी

नवकथाकारांच्या साहित्यातून एक वाट निर्माण कशी केली आणि त्या साहित्यातून ते वर्णन जाणिंवा साहित्यात येवू लागले. हे सांगितले आहेच. यामध्ये प्रामुख्याने १९४० च्या दरम्यान प्रादेशिक साहित्य जन्मले ते र. वा. दिघे यांच्या (१९४०) पानकळाच्या रूपाने होय. आणि प्रादेशिक साहित्य ठळकपणे नजरेसमोर आले. प्रादेशिक साहित्यातील गुणवैशिष्टयांचा अभ्यास करताना त्यांच्यातील लक्षणे तत्वे या बाबतीत मदन कुलकर्णी, आनंद यादव, मा. गो. कागणे व प्रा. ल. ग. जोग यांच्या लेखनातील मीमांसा महत्वपूर्ण वाटतात. यामध्ये आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याच्या अनुशंगाने प्रादेशिकतेची वैशिष्टये यांनी सांगितली आहेत. प्रदेशातील मनुष्य हा महत्वाचा घटक होय आणि त्याला संबंध हा प्रदेशातील घटकावर कसा अवलंबून आहे ते स्पष्ट करतातना त्याचा निसर्गाशी असलेला संबंध—व्यक्तीचे स्वभावगुण त्याची भाषा शैली, संस्कृती— आणि मातीशी असलेली ओढ यातून प्रादेशिकता आकाराला येते हया वैश्ष्टियांतून 'प्रादेशिकता' संज्ञा अर्थपूर्णरित्या स्पष्ट होते आहे. म्हणून आनंद यादव यांनी सांगितलेली वैशिष्टये, लक्षणे, तत्वे महत्वपूर्ण वाटतात.

जयवंत दळवी व शिवाजी सांवत यांचा जीवन परिचय पाहताना त्यांच्या समग्र साहित्यावर दृष्टीक्षेप टाकला आहे व त्यांनी साहित्यामध्ये मिळविलेले स्थान हे अद्वितीय आहे. जयंवत दळवी व शिवाजी सांवत हया दोन्हीं लेखकांनी आपल्या साहित्याकृतींतून स्वत:चे एक वेगळेपण निर्माण केले आहे. त्याच बरोबर दोन्ही दिग्गज साहित्यीकांना कित्येक पुरस्कार मिळालेले आहे. परिशिष्ठातही यादी दिली आहे.

या दुस—या प्रकारणात लेखकाचा जीवन व वाङ्.मयीन परिचया बरोबर त्यानां मिळालेले विविध पुरस्कार यांचाही नामोल्लेख या प्रकारणात केलेला आहे.

'सारे प्रवासी घडीचे' पुस्तक परिचय गोषवारा या तिस—या प्रकरणात 'सारे प्रवासी घडीचे ची त्यांच्या जन्मभूमीची निर्मिती प्रेरणा लेखकाला मातृभूमी

कोकणातील आहे. हे स्पष्ट केले आहे. त्याच बरोबर लेखका ही कथा सांगतो आहे. याचे दर्शन घडविताना लेखकाने कोकणातील आरवली गावातील घटना प्रसंगांची निवड व पात्र परिपोश सांगताना निवडक समर प्रसंगांच्या आधारे संभवनीय घटकांच्याद्वारे कुतूहल निर्मिती करून मार्मिक शब्दांतून विनोद साधला आहे. या बरोबरच कथानकाचा वेधक विकास करताना पात्रे आपल्या बरोबर बोलत आहेत. याची जाणीव होते. म्हणजेच लेखक कथानकाकडे जेवढे विनोदी शैलीने वर्णन केले आहे. याचे प्रत्यंतर 'सारे प्रवासी घडीचे' मधून येते. याच बरोबर कोकणातील लोकांची जीवनपध्दती व्यक्ती व्यक्तींच्यातील भावसंबंध स्पष्ट करतो. स्वातंत्र्योत्तर काळातील लोकांची बदलत गेलेली मानसिकता ही स्पष्ट होते. जाती—भेद वंशपरंपरा यात जखडला गेलेला समाज आणि त्यातून समाजाची जुन्या विचारांनी घातलेली मिठी व त्यातून बाहेर पडण्यासाठी धडपडणारा गरीब दलित समाज याचेही वेळोवेळी दर्शन घडविले व विचार मांडताना दिसतों ते लक्षणीय आहे.

'अशी मने असे नमुने' पुस्तक परिचय गोषवारा या चौथ्या प्रकरणात लेखक शिवाजी सावंतांच्या लेखनाची प्रेरणाच्या कशी मिळाली शिवाय त्यांना आपल्या गावाविषयी असणा—या ओढीतून आणि चिरकाल मनावर उमटलेला ठसा 'अशीमने असे नमुनेतून लेखक मांडतो आहे. यामध्ये बारा व्यक्तीच्या पुरूष आहेत तर केवळ दोन व्यक्ती स्त्री पात्र आहेत. ही साहित्यकृती व्यक्तिचित्रणात्मक आहे हे स्पष्ट होते.

शिवाजी सांवताच्या बालपणीच्या आठवणीतून लेखकाने एकेक व्यक्तिचित्रण लिहले आहे. जरी यामध्ये प्रत्येक व्यक्तिचित्रण जोडला गेला आहे. प्रत्येक घटनेचा, प्रसंगांचा तो साक्षीदार आहे. शिवाय यातील प्रत्येक पात्र हे इतर व्यक्तिचित्रणामध्ये पहावयास मिळतात. या व्यक्तिचित्रण संग्रहामध्ये लेखकाने लेखनाला प्रेरणा देणारे हे त्याचे गाव 'आजरा' होय. यातून लेखक एकेका व्यक्तींच्या जीवनपद्धतीवर वागण्या बोलण्यावर वृत्ती अपवृत्तीवर प्रकाश

टाकताना त्यांच्या तोंडची वाक्ये जशीच्या तशी लिहितो अस्सल ग्रामीण कोल्हापूरी भाषेचे प्रत्यंतर येते. यातील एक व्यक्तिचित्रण हे त्याला अपवाद 'पाचवा सांवत' हे होय.

'अशी मने असे नमुने' तील नमुनेदार व्यक्तींनी शिवाजी सांवताना लिखाणाचं बळं कसे दिले आहे या विषयी त्यांनी साहित्याकृतीच्या सुरूवातीलाच या लोकांना ही साहित्यकृतीतून अर्पण केली आहे. यातून लेखकाची भावानिकता दिसते. प्रत्येक व्यक्तीचित्रणातून स्वभाव वैशिष्टये, शरीररचना, वर्णन, प्रसंग निवड, घटनांची मांडणी, आटोपशीर कथानक, प्रत्येक व्यक्तींचे जाणवलेले जीवनाचे तत्व मांडण्याची पध्दतही शेवट प्रभावी करण्याची प्रवृत्ती ही शिवाजी सांवताची लेखनाच्या धाटणीतून 'अशी मने असे नमुने' आकारता येते.

जाती धर्माची बंधने तोडून लेखक ब्राम्हण, गवळी, कुळवाडी, अस्पश्य, स्वजातीय मराठा व्यक्तींची वर्णन करताना लेखक आपल्या लेखन प्रतिभेतून त्यांना न्याय देत जातो त्यामध्येपुरूषांबरोबर स्त्री सुध्दा तितकीच ताकदीची आहे हे सांगणारी तातू ही कथा होय. तर कांत्या –ब्राम्हण, गणपत–गवळी, काका गवंडळकर –शिंपी खुदबू–मुस्लिम अशा वेगवेगळया जाती धर्मातील लोकांच्या सानिध्यात आला आणि प्रत्येकाचे जगण्याचे वैशिष्टय शब्दबध्द करणे त्यांचा संवादाचा अभ्यास केला आहे. 'अशी मने असे नमुने' ची ग्रामीण बोली भाषा कशी समृध्द आहे हे प्रत्येक व्यक्तिचित्रणातून प्रत्येक व्यक्तीच्या तोंडच्या संवादातून स्पष्टपणे जाणवते. ग्रामीण जीवनातील लोकांच्या वृत्ती प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारी ही एक साहित्यकृती होय

दोन्ही साहित्याकृतीतून लेखकाने ग्रामीण बोली भाषेतील शब्दांचा वापर केलेला आहे हे समजते.

दोन्ही साहित्यकृतींचा सामाजिक आशय व वाड्.मयीन सौंदर्य – तौलनिक अभ्यास या प्रकरणात दोन्ही साहित्यकृतींतील आशयातून सामाजिक बांधिलकी जाणवते या दोन्ही लेखकांची ही आत्मकथाच होय हे स्पष्ट होते.

जयवंत दळवी — सिंधूदुर्ग जिल्हयातील 'आरवली,' व शिवाजी सांवत कोल्हापूर जिल्हयातील 'आजरा' गावाचे आहेत. थोडक्यात दोन्ही लेखकांच्या गावाचा प्रदेशाचा त्यांच्या मनावर पडलेला प्रभाव त्यातून भेटलेली व्यक्ती व त्यांच्या सानिध्यातील अनुभव मांडताना सामाजिक मानसिकतेचे दर्शन दोन्ही लेखकांनी आपल्या आपल्या साहित्यकृतीतून चित्रित केले आहे.

'सारे प्रवासी घडीचे' मध्ये जयवंत दळवीनी प्रथमपुरूष निवेदन पध्दतीचा वापर केला आहे. तर शिवाजी सांवतांनी प्रथमपुरूषी व तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा अवलंब केला आहे. शिवाय व्यक्तींच्या तोंडची संवादे ही जशीच्या तशी लिहिली आहेत. त्यामध्ये कोकणी व कोल्हापूर येथील ग्रामीण भागातील लोकांची बोली भाषा याचे दर्शन त्यांच्या संवादातून घडते साहित्यातून त्याला प्रदेशाची भाषा शैली लक्षात येते. निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर केला आहे. भाषेत कोकणी मराठी, हिंदी शब्दांच्या वापराबरोबर म्हणी, वाक्यप्रचार इ. वापर लेखक समर्पक पणे केला आहे. 'सारे प्रवासी घडीचे', 'अशी मने असे नमुने' हे शिर्षक का दिले? त्याची प्रतिकात्मकता ही सांगितली आहे. नंतर आपला गावगाडा रेखाटताना लेखक तटस्थपणे वर्णन करतो हे समजते याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.